क्योसेरा लेसर प्रिंटरसाठी नवीन टोनर पुरवठा करणेबाबत जाहीर नोटीस

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसाो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते की, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व अधिपत्त्याखालील तालुका न्यायालयांमधील क्योसेरा लेसर प्रिंटरचे नवीन टोनर पुरविणेसाठी नोंदणीकृत तसेच इच्छूक सेवाधारकांकडून ही जाहिरात प्रसिध्द झालेपासून ते दि. ३०/०७/२०२५ इ. रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद निविदा मागणविणेत येत आहेत याची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

हुकूमावरुन,

सहा. अधिक्षक(वित्त),
जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर

दिनांक – २३/०७/२०२५.

क्योसेरा लेसर प्रिंटरसाठी नवीन टोनर पुरविणे करीताच्या नियम व अटी खालीलप्रमाणे

०१	क्योसेरा लेसर प्रिंटरमधील नवीन टोनरकरीता येणारा खर्च निविदेमध्ये भरावा. नंतर वेगळा आकार/ शुल्क दिले जाणार नाही.
०२	जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व अधिपत्त्याखालील तालुका न्यायालयांमधील क्योसेरा लेसर प्रिंटरसाठी नवीन टोनर पुरविणेचा कालावधी करार मंजुरीपासून एक वर्षाचा राहील.
०३	पुरवठादारांनी निविदेमध्ये सदरहू टोनरचा दर तसेच जी.एस.टी.ची टक्केवारी वेगवेगळी नमूद करावी.
०४	उपरोक्त नवीन टोनर हे निविदाधारकांनी मा. जिल्हा न्यायालय, न्यायसंकूल इमारत, कसबा बावडा, कोल्हापूर येथे पुरविणेचे आहेत.
०५	निविदा भरणा-यांनी टोनरमधील चांगल्या दर्जाची शाई असलेले टोनर पुरविणेचे आहेत व जुने खराब झालेले टोनर पुन्हा घेवून जाणेचे आहेत.
०६	सदरहू निविदा पाठविताना निविदाधारकांनी त्यासोबत आपला पॅन कार्ड क्रमांक, जी.एस.टी. प्रमाणपत्र, उद्योग आधार प्रमाणपत्र व अधिकृतता प्रमाणपत्र (Authorisation Certificate) जोडावे.
०७	निविदेचा दर समान असलेस जी.एस.टी. नंबर धारक पुरवठादारांना प्राधान्य दिले जाईल.
०८	महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निविदा भरु नये. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.
०९	निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतिम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसाो, कोल्हापूर यांना राहील.
१०	क्योसेरा लेसर प्रिंटरमधील नवीन टोनर करिताची सिलबंद निविदा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसाो, कोल्हापूर यांचे नांवे पाठविणेत याव्यात.
११	निविदाधारकांनी निविदा मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे दिनांक ३०/०७/२०२५ इ. रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील या बेताने भराव्यात. नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

१२	सदर प्राप्त होणाऱ्या निविदा दिनांक ३१/०७/२०२५ इ. रोजी सकाळी ११.०० वाजता मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे निजीकक्षामध्ये उघडणेत येतील. त्यावेळी निविदाधारकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.
१३	सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर या न्यायालयाच्या http://ecourts.gov.in/kolhapur या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आलेली आहे.

प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेकरिता

१. संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सूचित करणेत येते की, सदरील जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर या कार्यालयाच्या http://ecourts.gov.in/kolhapur या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत यावी.
२. मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर.
३. मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर.
४. मा. मुख्यन्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर.
५. मा. जिल्हाधिकाधिकारी कार्यालय, कोल्हापूर.
६. मा. तहसिलदार कार्यालय, कोल्हापूर.
७. कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.